# गोखले : नवदर्शन

मु. गो. देशपांडे



Y2wM66:9
M8
264045

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-264045

# गोखले - नवदर्शन

# गोखले - नवदर्शन

मु. गो. देशपांडे

परिमृघा प्रकाशन / नासिक - २

प्रकाशक :

परिमृधा प्रकाशन
रमा-निवास, गोळे कॉलनी
नासिक : ४२२००२

●

© मु. गो. देशपांडे

●

मुद्रक :


दिलीप माजगावकर
साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

●

मुखपृष्ठ : चारुहास पंडित

●

किंमत : रु. ९०/–



नामदार गोपाळ कृष्ण गोखले

खडकीचे भाऊ

कै. जगन्नाथ शंकर कुलकर्णी

यांच्या प्रेमळ स्मृतीस

# प्रास्ताविक

'गोखले-नवदर्शन' या शीर्षकाखाली या पुस्तकातील जे वेगवेगळे लेख एकत्र केलेले आहेत त्यांच्याविषयीं आवश्यक तेवढे खुलासावजा लिहिण्याचा यत्न आधी करतो.

या पुस्तकाचे पहिले प्रकरण 'मोर्ले' हे त्या कालखंडामध्यें जे भारताच्या मुख्यतः तीन प्रांतात उठाव झाले व ब्रिटिशांच्या राजवटीविरुद्ध जो असंतोष धुमसला त्याची थोडचा विस्ताराने पार्श्वभूमी विशद करणारे ठरावे म्हणून वाचकांच्यापुढे निवेदिलेले आहे. वंगभंग, पंजाबातील आर्यसमाजाची चळवळ आणि लालाजींची हद्दपारी व महाराष्ट्रातील तापलेले वातावरण यांची माहिती करून देण्यासाठी नवे संदर्भ आणि नव्याने उपलब्ध झालेली स्वातंत्र्यसंग्राम इतिहास समितीच्या सदस्यानी मिळविलेली वेगवेगळचा व्यक्तींच्या मुलाखतीची सामुग्री यांचा या कामी उपयोग झाला आहे. भारतात धुमसणाऱ्या असंतोषाबरोबरच खुद्द इंग्लंडमध्ये अशा राजवटीविरुद्ध केवढा तीव्र संताप व्यक्त होत होता त्याचेही थोडेसे दर्शन 'गोखले पत्रव्यवहारा'तील काही पत्रांमुळे घडविता आले. हा लेख दीर्घ झालेला आहे. परंतु तो विभागा–विभागाच्या स्वरूपात लिहिला गेलेला आहे आणि तसे दाखवणारी चिन्हे वापरलेली आहेत.

'जहाल मवाळ' अशा ढोबळ पद्धतीने जी टिळक आणि गोखले यांच्या राजकारणाची ओळख आपल्याला नेहमीच्या ग्रंथातून करून देण्यात येते ती या दोन्ही नेत्यांच्या बाबतीत कशी फसवी ठरते, निदान संपूर्णतया लागू न पडणारी तरी कशी दृष्टोत्पत्तीस येते, हे आता पाऊणशे ऐंशी वर्षांचा काळ गेल्यानंतर आपल्या नजरेस येऊ शकेल इतकी नवी माहिती वाचकांच्यासमोर सध्या आलेली आहे. त्याचबरोबर बंगालमधील पुनरुज्जीवनवादी चळवळीचा वाढता जोर आणि स्वामी विवेकानंदांच्या विषयीची आर. सी. मुजुमदार यांनी नमूद करून ठेवलेलीं

हिरॅम मॅक्झिम या बंदुकीच्या कारखानदाराशी असलेली त्यांची मैत्री व स्वामी विवेकानंदांचे त्यासंबंधीचे मनोगत हेही माझ्या समजुतीप्रमाणे मराठी वाचकांपुढे प्रथमच येत आहे. 'हिस्टरी ऑफ दि फ्रीडम स्ट्रगल' हे आर. सी. मुजुमदार यांचे त्रिखंडात्मक पुस्तक पूर्वीच प्रसिद्ध झाले आहे. पण त्यातील विवेकानंदांच्या संबंधीचा हा मजकूर मराठी वाचकांपुढे इतके दिवस का यायचा राहून गेला याचे उत्तर मला सापडलेले नाही. ते काही असो, ही माहिती फारच मोलाची आहे यात शंका नाही. ती विश्वसनीय आहे की नाही याचा विचार आर. सी. मुजुमदार यांनी केलाच असणार.

बंगालमधल्या पुनरुज्जीवनवादी चळवळीची माहिती '**मोर्ले**' प्रकरणात दिली आहे तशीच ती अगदी माफक प्रमाणात या पुस्तकातील '**सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांचे संपादक गोखले**' या लेखात दिलेली आहे. फारशी द्विरुक्ती झालेली नाही म्हणून तो पूर्वी 'नवभारत' मासिकात प्रसिद्ध झालेला लेख जसाच्या तसा एक प्रकरण म्हणून छापलेला आहे.

पंजाबातील उठावाची पार्श्वभूमी समजून यावी म्हणून तिथे लागू झालेल्या नव्या शेतीविषयक आणि जमीनमालकीच्या हस्तांतरासंबंधीचे जे कायदे झाले त्यांची माहिती स्टॅन्ले वोलपर्ट प्रभृति लेखकांनी विस्ताराने त्यांच्या ग्रंथातून दिली आहे. खेरीज आर्य समाजाचा वाढता प्रभाव इंग्रज सरकारला भीती दाखवणारा कसा ठरत होता हेही नवीन माहितीच्या स्वरूपात आता वाचकांना कळून येऊ लागले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मोर्ले किंवा मिंटो यांचे जतन करून ठेवलेले कागदपत्र आंता कालांतराने त्यांची गुप्ततेची मर्यादा संपल्यामुळे प्रसिद्ध झाले आहेत. किंवा अभ्यासकांना उपलब्ध झाले आहेत. म्हणून या कालखंडाचा विचार नव्याने होणे हे अगत्याचे होऊन बसले आहे. मराठी वाचकांना माझ्या प्रयत्नाहून साक्षेपी-पणाने कोणा विद्वानाने किंवा विद्वानांच्या समूहाने या कालखंडाचे आता अधिक प्रभावी दर्शन घडवले तर गोखल्यांना न्याय दिल्यासारखे होईलच, परंतु ऐतिहासिक दृष्टया किती तरी नवीन तऱ्हेचा उलगडा या कालखंडाबाबत होऊ शकेल.

खुद्द मोर्ले हे त्यावेळच्या सुशिक्षित भारतीयांचे एक दैवत होते. भारतीय राजकारणामधे त्यांच्याकडून फार मोठी निराशा झाली. पण राजकारण हा एका व्यक्तीच्या हातचा खेळ सर्वस्वी नसतो आणि तुटेपर्यंत ताणू नये हे न समजल्यामुळे सुरेन्द्रनाथ बानर्जी व ओडॉनेल यांच्या हातून मोर्ल्यांचे मन भडकण्याइतके तापवले गेले म्हणून बंगालची फाळणी लगेच रद्द झाली नाही. जरी त्यांनी मनाशी योजि-लेल्या सुधारणा अमलात यायला असह्य असा विलंब झाला आणि आल्या त्या सुधारणाही रिस्ले याने निर्माण केलेल्या विभक्त मतदारसंघाचे विष घेऊन आल्या तरी नव्या भारताची उभारणी ज्या नव्या राजकीय तत्त्वावर म्हणजे लोकांच्या इच्छेने निवडून गेलेल्या प्रतिनिधींच्या सल्ल्याने व्हावी व राज्यकारभारात प्रजेचा

योग्य त्या पद्धतीने सहभाग असावा हे तत्त्व प्रथम मान्य झाले. हे भूकंपाच्या कल्लोळात कुणी तरी नेहमीच्या औषधाच्या गोळ्या देऊ कराव्यात असले हास्यास्पद कृत्य त्यावेळी होते. असा अभिप्राय स्टॅन्ले वोल्पर्टने यासंबंधात प्रकट केला आहे. म्हणूनच त्या सुधारणा देशाला त्या वेळी महत्त्वाच्या वाटल्या नाहीत. तथापि देशाची उभारणी आता स्वातंत्र्यानंतर आपल्याला जी करायची आहे त्या उभारणीच्या कामी गोखल्यांनी या सुधारणा मिळविण्याकरिता जे रक्त आटवले त्याच ध्येयदृष्टीची गरज आहे. नवा हिंदुस्थान कसा होणार त्याचे भव्य स्वप्न गोखल्यांनी पाहिले होते व त्या स्वप्नाकडे जाण्याची पहिली पायरी म्हणून ते त्या सुधारणांकडे पाहात होते. कर्झनला त्यांनी औरंगजेब म्हटले; पण मोर्ल्यांना इतकी निराशा त्यांनी केली असूनसुद्धा गोखल्यांनी विशेष बोल लावलेले आपल्याला आढळत नाहीत. उलट मिळालेल्या सुधारणा किती महत्त्वाच्या आहेत हेच ते वारंवार सांगत होते.

अशा मोर्ल्यांच्याविषयी मराठी वाचकांना थोडे अधिक कळावे म्हणून त्यांची व्यक्तिगत माहितीही या दीर्घ प्रकरणात दिलेली आहे.

**'इंडिया साप्ताहिकाची थोडीशी ओळख'** या प्रकरणासंबंधी येथे एवढेच लिहावेसे वाटते की, आपल्या स्वातंत्र्याच्या इतिहासात भारतीय काँग्रेसच्या ब्रिटिश कमिटीने जे कार्य केले त्याचा जरुर तेवढा ऊहापोह घडलेला नाही असे मला वाटते. ते कार्य या इंडिया साप्ताहिकाच्या द्वारे मुख्यतः ब्रिटिश कमिटीने १८८९ पासून ते टिळकांच्या अखेरीच्या दिवसापर्यंत चालविले होते. टिळकांच्या राजकारणाचा जोर १९०४ ते १९०८ पर्यंत जसजसा वाढू लागला तसतसा 'इंडिया' पत्राबद्दल त्या गटात जरी नाराजीचा सूर उमटू लागला होता तरी खरे पाहिले असता इंग्लंडात हिंदुस्थानची बाजू ब्रिटिश सत्तेला अतिशय अस्वस्थ करून सोडणाऱ्या पद्धतीने 'इंडिया' हे साप्ताहिक मांडत होते. गोखले आणि गोखले पक्षीय यांच्या ताब्यात ते होते पण त्या साप्ताहिकातील लेख फार भेदक होते. शिवाय भारताची बाजू घेणाऱ्या मोठमोठ्या इंग्रज लेखकांची सहानुभूति आणि सहकार्य या साप्ताहिकाने मिळविले असल्याचेही आपल्याला दिसते. अशा फार मोठ्या कार्याची ओळख गोखले चरित्रात जेवढी करून द्यायला पाहिजे तेवढी मराठी भाषेतील गोखले वाङ्मयात तर नाहीच, पण इंग्रजीतील गोखले वाङ्मयातही ती अगदी त्रोटक स्वरूपात करून दिलेली आढळते. हे 'इंडिया' साप्ताहिक हा फार मोठा राजकीय अभ्यासकांना आणि इंग्रजी विषयाच्या अभ्यासकांना उपलब्ध होऊ शकणारा खजिना आहे. मी जे प्रकरण लिहिले आहे ते माझ्या मर्यादित शक्तीमुळे व साहाय्याच्या अभावामुळे इतके लहान झाले आहे. या साप्ताहिकाची पंचवीस तीस वर्षांची बांधीव पुस्तके जो अभ्यासक पाहील त्याला सहज नवीनच अशी केवढी तरी माहिती भारतीय वाचकांपुढे ठेवता येईल.

फक्त त्याला योग्य ते साह्य मिळाले पाहिजे.

**'सिडने वेब यांचे एक पत्र'** हे स्वतंत्र प्रकरणच करण्याचे कारण त्या पत्रातील सघन आशय आणि त्या पत्राचे प्रदीर्घ स्वरूप हे होय. 'गोखले–पत्रव्यवहार' या अतिशय मौल्यवान अशा फार मोठ्या पत्रसंग्रहात अनेक विख्यात स्त्रीपुरुषांची गोखल्यांना आलेली पत्रे जपून ठेवलेली आहेत. त्यातली जी मला फार काळच्या तपश्चर्येने उपलब्ध झाली त्यात एवढे दीर्घ आणि इतक्या महत्त्वाच्या विषयांची चर्चा करणारे दुसरे पत्र अजून आढळलेले नाही. मला या पत्रसंग्रहातील कितीतरी पत्रे अद्यापि अज्ञातच आहेत. त्यामुळे या पत्राएवढे दीर्घ किंवा याहूनही दीर्घ आणि महत्त्वाचे असे दुसरे पत्र 'गोखले-पत्रव्यवहारात' नसेलच असे मी म्हणू शकत नाही. तथापि माझ्याजवळ उपलब्ध असलेल्या पत्रात हे सर्वात मोठे आहे.

शिवाय गोखले चरित्रांची एक फार मोठी उणीव मला आढळून आली ती सिडने वेब यांच्या त्यातील संपूर्ण अनुल्लेखाची. म्हणून या गोष्टीला प्राधान्य दिले गेले पाहिजे आणि इथून पुढच्या 'गोखले'विषयक लेखनामध्ये गोखले आणि वेब दांपत्य यांच्यासंबंधी जरूर ते लिहिले गेले पाहिजे असे लोकांना पटावे या उद्देशाने हे स्वतंत्र प्रकरण केले आहे. विषयाच्या दृष्टीनेही ते तेवढ्या महत्त्वाचे आहे हे कोणालाही दिसून येईल. बिएट्रिस वेब यांची 'इंडिया डायरी' प्रसिद्ध होण्यापूर्वी कितीतरी आधी माझा लेख तयार झाला होता.

**'गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास'** हे प्रकरण लिहिण्यामागे एक उद्देश असा होता की गोखल्यांचे चरित्र रुढ पद्धतीने पुन्हा लिहिणे हे तितकेसे मनाला पटणारे नसल्याने एकूण गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आपल्या दृष्टीने वेध घ्यावा. दुसरा उद्देश हा की एवढ्या उंचीपर्यंत सामान्य स्थितीतील एक तरुण कसा चढत गेला याचा मागोवा घेणे आणि या अचंबा वाटणाऱ्या महानतेची आपल्या परीने मीमांसा करणे हे मनाला मोहून टाकणारे आहे. आपण ते अल्पस्वल्प रीतीने करून पाहावे.

गोखले चरित्र फार परिश्रमपूर्वक आणि उपलब्ध झालेल्या व होऊ शकणाऱ्या सर्व साधनसामुग्रीचा उपयोग करून प्रतिभासंपन्नतेने लिहिले गेले पाहिजे. गोखल्यांची डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील बहुमोल सेवा, कौन्सिलामधली भाषणे, वेल्बी कमिशनपुढील साक्ष, काँग्रेसचे कार्य, प्लेग निवारण कार्याच्या संदर्भात सरकारवर केल्या गेलेल्या आरोपांबाबत त्यांनी मागितलेली माफी, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना, आफ्रिकेतील हिंदी बांधवांच्या मदतीसाठी त्यांचे धावून जाणे व गांधीजीना त्यांनी केलेले साहाय्य, रॉयल कमिशनचे त्यांचे कार्य हे सारे गोखले चरित्राचा भाग आहे यात संशयच नाही. पण या गोष्टींचा बाह्य तपशील नुसता देऊन गोखले चरित्र खऱ्या अर्थाने निर्माण होणार नाही. त्यांच्या अंतरीचे वेगवेगळ्या काळातील हेलकावे आणि त्यांच्या मनाशी निर्माण झालेले काही हर्षखेदाचे उमाळे यांचेही दर्शन शक्य तेवढे सत्याधिष्ठित घडावे आणि ते विश्वसनीय

रीत्या घडावे यासाठी त्यांची पत्रे आणि त्यांना आलेली पत्रे व त्यांच्या अनेकविध स्वरूपाच्याकामगिरीतील त्यांनी अनुभवलेले यशापयश यांचा थोडा मानसिक मागोवा घेता आला तर ते चरित्र त्रिमिति असलेले होईल. सध्याची गोखले चरित्रे ही अपेक्षा पुरी करणारी वाटत नाहीत. तसलेच चरित्र लिहिण्याची काय गरज आहे ?

नवीन माहिती मिळविण्याचा कसलाही प्रयत्न न करता जे पूर्वीच दुसऱ्यांनी लिहून ठेवले आहे ते निराळ्या शब्दात सांगून आपण आणखी एक गोखले चरित्र लिहिले असे म्हणण्याची काय गरज आहे असे मी जरी म्हटले तरी ते अर्थातच सर्वार्थाने ग्राह्य वाटण्याजोगे नाही. जी जुनी गोखले चरित्रे लिहिली गेली आहेत ती नवीन माहिती व त्या नवीन माहितीच्या आधारे केलेली नवीन मांडणी ही दर्शविणारी नसली तरी वाचकांना ती जुनी पुस्तके सहजासहजी मिळत नाहीत आणि राष्ट्रीय नेत्यांच्या चरित्राची गरज तर शाळा कॉलेजातील विद्यार्थी वर्ग आणि आम जनता यांच्या दृष्टीने वाढत्या प्रमाणात भासत असते. माझे पूर्वीचे **'फ्लॉरेन्स नाईटिंगेल वेडरबर्न आणि गोखले'** हे पुस्तक काही शाळामधून जेव्हा दाखवले गेले तेव्हा मला विचारण्यात आले की हे गोखले चरित्र आहे काय ? तसे असेल तर शाळा त्या पुस्तकाचा विचार करतील. म्हणजे रूढ पद्धतीने लिहिलेले, नवी माहिती समाविष्ट न करता लिहिलेले गोखले चरित्र जोपर्यंत बाकीच्या मजकुराच्या बाबतीत विश्वसनीय असेल तोपर्यंत तसल्या चरित्राची गरज आहे. नव्या माहितीचा उपयोग करून व पत्रव्यवहाराच्या आधाराने लिहिलेल्या नव्या चरित्राची गरज आहे हे मला विशेष रीतीने सांगायचे आहे.

**'गोखल्यांच्या भाषणांची गुणवत्ता'** हे प्रकरण लिहिण्यातील उद्देश त्या लेखात पूर्णपणे स्पष्ट केलेला आहे. गोखल्यांची भाषणे इंग्रजीतूनच अधिकांशाने झाली असल्यामुळे मराठी समाजाने फक्त एवढेच मनाशी बिंबवून घेतलेले आहे की, गोखल्यांचे इंग्रजी भाषेवर विलक्षण प्रभुत्व होते. या भाषणांच्या विषयासंबंधी अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी योग्य ते विवेचन केले आहे हे खरे आहे. तथापि या भाषणांची ती बाजू जरी भरीव असली तरी ती भाषणे प्रभावी होण्यामागील गोखल्यांचे कौशल्य, तळमळ, विनोदबुद्धि, मांडणीतील रेखीवपणा आणि प्रसंगानुरूप व विषयानुरूप त्या त्या भाषणांच्या शैलीत व प्रतिपादनात गोखल्यांनी आणलेले वैविध्य मराठी वाचकांच्या नजरेस आणून देण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरेल असे मला वाटले नाही. यातील काही भाषणांमधून प्रकट झालेले गोखल्यांचे कोमल व भारतीय संस्कृतीच्या अभिमानाने भरून येणारे मन हेही खरोखर लक्षणीय आहे. यासंबंधी आधी कोणी विवेचन केल्याचे मला आढळलेले नाही. एका रीतीने गोखल्यांच्या अंतर्मनाची थोडीशी ओळख करून घेण्याचा हा प्रयत्न होता. पण भाषणांचा मूळविषय व त्याचे प्रतिपादन करण्याची गोखल्यांची रीत हाच प्रधान भाग असल्याने हा प्रयत्न वाचकांना जाणवण्याइतका स्पष्टपणे सफल झालेला

नाही हे मी जाणून आहे. शिवाय या भाषणांचे स्थळ आणि प्रयोजन हे ध्यानी घेता त्या भाषणामधून गोखल्यांच्या अन्तर्मनात डोकावता येण्याची शक्यता फारशी नव्हती. हे प्रकरण सर्वसामान्य वाचकाच्या दृष्टीने वाचनीय करण्याचा प्रयत्न मात्र मी केलेला आहे.

या भाषणांसंबंधी अगदी नुकतीच मला समजलेली जुनी माहिती अशी की, गांधीजींनी ही भाषणे गुजरातीमध्ये भाषांतरित करून घेण्याची व्यवस्था तर केलीच; खेरीज त्यांच्या सूचनेवरून ती हिंदीत व ऊर्दूतही भाषांतरित झाली.

**'गोखल्यांना आलेली काही पत्रे'** या प्रकरणात आजपर्यंत वाचकांना माहीत नसलेली बरीच पत्रे दिली आहेत सेल्बी किंवा लाला लजपतराय यांचे एखादेदुसरे पत्र संपूर्ण न देता त्यातील भाग उद्धृत करून नंदा किंवा माथुर यांनी आपल्या ग्रंथातून वाचकांपुढे ठेवले असले तरी इतर पत्रे संपूर्णपणे अज्ञातच राहिलेली आहेत. याखेरीज एकूण 'गोखले पत्रव्यवहार' अतिशय विस्तीर्ण असून त्याची थोडी कल्पना माझ्या पूर्वीच्या '**फ्लॉरेन्स नाईटिंगेल, वेडरबर्न आणि गोखले**' या लहानशा पुस्तकातील छोटया प्रस्तावनेत दिलेली आहे. 'त्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात ज्या पत्रांचा उल्लेख केलेला होता त्यातील बहुतेक या प्रकरणात मी विचारार्थ घेतलेली आहेत. ज्या पत्रांचा एकत्रितपणे विचार करावासा वाटला त्यांचा गोषवारा दिलेला आहे. जी संपूर्णपणे देण्याजोगी आहेत असे वाटले ती तशी भाषांतरित स्वरूपात दिलेली आहेत. विठ्ठल रामजी शिंदे, सिडने वेब, भगिनी निवेदिता, बडोद्याचे गायकवाड यांच्या पत्रामुळे गोखल्यांच्या व्यक्तिमत्वावर नवा प्रकाशझोत पडल्यासारखे कोणाला वाटले तर ते नवल नव्हे. कुमारस्वामी, रेव्हरंड अँण्ड्र्यूज, टागोर यांच्या पत्रातूनही या पत्रलेखकांचे व्यक्तिमत्त्व जसे प्रकट होते तसेच ज्या व्यक्तीला उद्देशून ही पत्रे लिहिली आहेत त्या व्यक्तीचीही महति अधिकच सुस्पष्टपणाने ध्यानी येण्यास मदत होते. महिनोन महिने वाट पाहून मोठया प्रयत्नाने मिळविलेली अशी त्या पत्रव्यवहारापैकी आणखी काही पत्रे मला उपलब्ध झालेली आहेत ती डॉ. भांडारकर, विष्णू मोरेश्वर महाजनी, गंगाधरराव चिटणवीस, दाजी आबाजी खरे, कॅलेन्बॅक, पादशाहा, विश्वेश्वरय्या, रामानंद चतर्जी, गोल्डस्वर्दी लोवेस डिकिन्सन, हर्बर्ट फिशर, ख्रिस्टिन ग्रीनस्टायडेल एल. डी. खोटे, किचनेर, पेथिक लॉरेन्स, व्ही. एच. रुदरफोर्ड, मद्रासच्या बिशपची बायको मिसेस व्हाइटहेड, केशवदेवशास्त्री-प्रेसिडेंट बनारस शहर आर्य समाज, वामनराव कोल्हटकर, मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन, चिमणलाल सेटलवाड, मदनमोहन मालवीय, वर्डवुड, मुधोळकर, के. नटराजन, प्रसिद्ध चित्रकार रोदनस्टाइन यांची आहेत जर या नवदर्शन प्रयत्नाचा आणखी एखादा ग्रंथ तयार करण्याएवढी उमेद निर्माण झाली तर या प्रकरणात समाविष्ट न केलेल्या पत्रांची यादी वर दिली आहे, त्यातील पत्रांचा परिचय प्रत्यक्ष भाषांतर करून अथवा

त्यांचा वापर करून लिहिलेल्या वेगळ्या प्रकरणामधून वाचकांना जरूर करून देण्याची इच्छा मी बाळगून आहे.

किंबहुना गोखले–पत्रव्यवहाराचे हे विशाल स्वरुप मी प्रथम पंचवीस वर्षांपूर्वी खुद्द पुण्यातच सर्व्हंटस् ऑफ इंडियाच्या ऑफिसात पाहिले तेव्हापासून मी या कामाच्या तीव्र इच्छेने झपाटलो गेलो आहे. मध्यंतरी अनेक इतर कामे उद्भवली, पुढे हा पत्रसंग्रह दिल्लीला हलवला गेला आणि या पत्रव्यवहाराच्या मायक्रोफिल्मस् मिळू शकल्या तरी त्या वाचण्यासाठी लागणारा मायक्रोफिल्म रीडर पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात काही दिवस उपलब्ध झाला, परंतु तो बिघडल्यानंतर त्याच्या दुरुस्तीसाठी परदेशातून ते बल्बज् आणावे लागतील असे समजले. एशियाटिक सोसायटी या कामी उपयोगी पडेलसे वाटले, परंतु तिथेही ही यंत्रणा नव्हती. म्हणून ते सारेच काम थांबले. अखेर नॅशनल आर्काइव्हज्‌ने या पत्रव्यवहारापैकी निवडक अशा थोड्याच पत्रांच्या झेरॉक्स किंवा टाइप केलेल्या प्रती पुरवण्याची तयारी दाखवून मला उपकृत केले म्हणून तर '**फ्लॉरेन्स नाइटिंगेल, वेडरबर्न आणि गोखले**' या पुस्तकातील नाइटिंगेल बाईंचे पत्र, बार्बरा स्टीफनने लिहिलेले नाइटिंगेलबाईंचे चरित्र, वेडरबर्न यांची काही पत्रे आणि या लेखसंग्रहात घेतलेली व घेतली नसली तरी ज्यांचा निर्देश वर केलेला आहे ही पत्रे मला मिळू शकली. 'गोखले–नवदर्शन' हे पुस्तक या पत्रांची ओळख करून देण्याचा प्रमुख उद्देश मनाशी धरून तयार करायचे होते. त्या उद्देशाप्रमाणे, '**सिडने वेब यांचे एक पत्र**' '**निवेदिता, सरला रे आणि सरोजिनी नायडू**' हे प्रकरण व 'गोखल्यांना आलेली काही पत्रे' हे प्रकरण ही सिद्ध केलेली आहेत.

'**निवेदिता, सरला रे आणि सरोजिनी नायडू**' या प्रकरणाविषयी येथे प्रास्ताविकात सांगण्यासारखे विशेष काही खरे म्हणजे नाही. फक्त एक दोन गोष्टीच हे स्वतंत्र प्रकरण तयार करावे असे मला वाटण्याला कारणीभूत झाल्या आहेत. भारतीय पुढाऱ्यांपैकी राष्ट्रीय स्तरावर अजरामर झालेल्या पुढाऱ्यांचा विचार करू लागलो म्हणजे शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि शक्य झाल्यास राजकीय कार्य यात स्त्रियांचा वाटा असला पाहिजे व ज्या स्त्रिया निर्भयपणे ही कामे अंगावर घेऊ शकतील अशा स्त्रियांच्या कामाला उत्तेजन देणे हे जरुरीचे आहे हे गोखल्यांना प्रथम जाणवले असे म्हणता येण्यासारखे आहे. शिवाय गोखल्यांच्या भावजीवनाचा विचार केल्यास या सुविद्य आणि तेजस्विनी स्त्रियांच्या अधूनमधून लाभणाऱ्या साहचार्यामुळे त्यांचे मन जेव्हा हलके व्हायला पाहिजे तेव्हा हलके झाले असावे, जेव्हा नव्या कामाची प्रेरणा मिळावी असे त्यांना वाटत असेल तेव्हा अशी प्रेरणा देणारे ठरले असेल व या स्त्रियांनाही गोखल्यांच्या धीरोदात्त व देशसेवेसाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या व्यक्तीकडून जरूर ते मनोबल प्राप्त झाले असेल. तारा अली बेग यांनी भारत सरकारच्या प्रकाशन विभागासाठी जे सरोजिनी

नायडूंचे चरित्र लिहिले आहे त्यातील गोखले आणि सरोजिनी नायडू यांच्या संबंधीचा भाग सुद्धा या विधानाचे समर्थन करणारा ठरावा. असले तर्क चरित्रलेखनांत आधारावाचून करता येत नाहीत. कादंबरीत ते खपून जातील; परंतु तरीही या पत्रव्यवहारातील काही ठिकाणे अशी आहेत की जेथे एकमेकांच्या भावजीवनातील तारांचा सहकंप झालेला आपल्याला प्रतीत होतो. अशा काहीशा विलोभनीय पत्रांचा विचार एकत्रितपणे केलेला या प्रकरणात आढळेल. मात्र मूळ हेतू पत्रांचा परिचय करून देणे हाच आहे.

आणि हे भान कुठेही सुटू नये की गोखले जेव्हा बंगालमध्ये प्रथम गेले तेव्हा ते बाह्यतः तसे कोणालाही दिसत वा भासत नसले तरी संन्यस्त वृत्ती अंगी शिरत चाललेले देशसेवा व्रताने भारलेले वजनदार पुढारी होते. मुंबईच्या कौन्सिलमधून इंपीरियल कौन्सिलमध्ये जाताना त्यांनी फेरोजशहा मेथांना जे पत्र लिहिले होते त्यात म्हणून ठेवले होते की माझे सर्व सांसारिक पाश आता संपलेले आहेत.

म्हणून निवेदिता, सरला रे आणि सरोजिनी नायडू यांच्याशी त्यांचा जो संबंध साधारण दहा वर्षांपर्यंत आला ते भावस्थिर असे जननान्तर सौहार्द असे भासले तरी गोखल्यांचे अन्तर्मन आपल्या कर्तव्य जागृतीने सदैव प्रकाशित झाले होते व त्यामुळेच या स्त्रियाही त्यांच्या प्रभावाने कमी अधिक प्रमाणात भारून गेल्या होत्या,

**'गोखले आणि वृत्तपत्रसृष्टी'** हे प्रकरण एवढ्यासाठीच स्वतंत्रपणे घातले आहे की यातील मजकूर जरी एखाद्या भरीव प्रकरणाएवढा नसला तरी गोखल्यांचे वृत्तपत्रांच्या महतीविषयीचे उद्‌गार वाचकांच्या दृष्टीस स्वतंत्र रीतीने यावेत. खेरीज गोखले पत्रव्यवहारातील विल्यम स्टेड यांचे एका देशातील वृत्तव्यावसायिकांनी दुसऱ्या देशाच्या वृत्तव्यावसायिकांच्या निमंत्रणाचा स्वीकार करून तेथील राजकीय, इतर परिस्थितीचा प्रत्यक्ष अवलोकनाने अभ्यास करावा या संबंधीचे मनोगत मोठे कुतूहलजनक वाटण्याजोगे आहे. ते देण्याचे हेच ठिकाण होते. गोखले पत्रव्यवहाराचा उपयोग करून एखादे स्वतंत्र प्रकरण लिहायचे या दृष्टीने स्टेड यांच्या थोड्याशा मोठ्या पत्राचा आशय येथे देऊन त्याच्या भोवती गोखल्यांची वृत्तपत्रांच्या महतीची जाणीव येथे चितारलेली आहे. आज अलिप्त राष्ट्रे स्वतंत्रपणाने आपल्याला खऱ्या व विश्वसनीय अशा बातम्या मिळाव्यात या खटपटीत आहेत.

प्रबळ सत्ताच्या नियंत्रणाखाली असलेल्या वृत्त वितरण संस्थेकडून त्या त्या देशांच्या हितसंबंधांना जपणाऱ्या बातम्याच प्रस्तुत केल्या जातात इतर दडपल्या जातात किंवा विकृत करून पाठवल्या जातात अशी जोराची तक्रार आपण ऐकत आहोत. ही तक्रार फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या वेळेपासून चालू आहे हे त्या लहान पुस्तकात नमूद केलेच आहे.

**'सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक गोखले'** हा लेख **नवभारत**

मासिकात गोखले जन्मशताब्दीच्या थोडा आधी प्रसिद्ध झाला होता असे वाटते. गोखले चरित्रे पाहिल्यास आपणास असे आढळेल की चरित्र लेखकांनी फक्त गोखले सार्वजनिक सभेचे चिटणीस १८९० च्या सुमारास झाले व त्या अनुषंगाने ते त्या सभेच्या त्रैमासिकांचे संपादकही झाले एवढे सांगून तो विषय संपवलेला आहे. काहींनी तर ते सभेच्या त्रैमासिकाचे संपादक झाले या गोष्टीचा उल्लेखही केला असावा असे वाटत नाही. पण गोखल्यांची ही कामगिरी गोखल्यांचे नवे दर्शन घडविणारी आहे यात तिळमात्र संशय नाही. पूर्वीच्या बऱ्याच मंडळींचा समज असा होता की सभेच्या त्रैमासिकातील लेखन बहुतांशी रानडयांच्या हातचे असून रानडयांचे नाव मात्र त्या लेखनावर नव्हते. ही वस्तुस्थिती नाही. जेथे रानडयांचे नाव आहे असे सभेच्या त्रैमासिकातील लेखन दाखवून देण्यासारखे आहे. काही नाव नसलेले लेखन रानडयांचे असेल यात संशय नाही. पण गोखल्यांचे लेखन आणि संपादकीय कामगिरी अगदी संशयातीत रीतीने आपल्याला प्रतीत होते. म्हणून हा लेख 'गोखले—नवदर्शन' या दृष्टीने येथे समाविष्ट केलेला आहे.

परिशिष्ट (१) यामध्ये मी १९६८ साली कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररी-मध्ये या विषयासंबंधी अधिक माहिती काही मिळते का ते पाहण्यासाठी गेलो होतो त्या माझ्या कलकत्ता भेटीचा वृत्तांत थोडक्यात दिला आहे. तो जसाच्या तसा येथे थोडा पुनरुक्तीचा दोष मान्य करून घातला आहे. मात्र ही पुनरुक्ती क्षम्य ठरावी.

परिशिष्ट (२)मधील मजकुरासंबंधी त्या परिशिष्टातच सर्व खुलासा केलेला आहे.

गोखल्यांची शताब्दीनंतरची रौप्यजयंति १९९१ साली येईल. ज्याप्रमाणे रवीन्द्रनाथ टागोरांची १२५ वर्षांची जयंति १९८६–८७ सालात देशभर साजरी करण्यात आली त्याप्रमाणे गोखले यांची १२५ वर्षांची जयंती साजरी होऊ शकल्यास त्यावेळपर्यंत माझ्याजवळ अजून न प्रकाशात आलेली गोखले पत्रव्यवहारातील पत्रे व इतरही नॅशनल आर्काइव्ह्जमधून नव्याने उपलब्ध होऊ शकणारी पत्रे यांच्या मननाने आणखी काही गोखल्यांच्या कार्यासंबंधीचे नवे लेख सिद्ध होऊ शकतील. त्याआधी गोखल्यांच्या निधनाला १९९० साली पाऊणशे वर्षे होतात म्हणून गोखले स्मृतिदिनाचा अमृतमहोत्सवही साजरा होण्याची शक्यता आहे. म्हणजे येती दोन वर्षे १९९० ते १९९१ ही गोखले यांच्यासंबंधी नवीन जे काही सांगता येण्याजोगे असेल त्याबद्दलचे वाचकांचे औत्सुक्य वाढवणारी ठरावी. परंतु महाराष्ट्रीय समाजात गोखल्यांच्या नावाची थोरवी जेवढया थरातून झिरपली जायला पाहिजे तेवढया खालपासून वरपर्यंतच्या थरात ती झिरपलेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. '**भारताचे शिल्पकार**' या मालिकेत केंद्र सरकार त्यांना मान जरूर देत आले आहे. तथापि जनतेच्या मनात गोखल्यांचे स्थान अजून दृढ व्हायचे

आहे. या लेखसंग्रहातील काही नव्या माहितीमुळे गोखले महाराष्ट्रीय जनतेला अधिक आपलेसे वाटावयास लागतील अशी आशा मी बाळगलेली आहे.

'गोखले पत्रव्यवहार' हा विषय एका व्यक्तीच्या आवाक्यातला नाही, त्यातून तो निवृत्त होऊनही दहा वर्षे होऊन गेलेल्या व्यक्तीच्या आवाक्यातला मुळीच नाही, यात भरीला भर म्हणजे हा पत्रव्यवहार दिल्लीला जाऊन स्वस्थपणे अभ्यासून त्याच्या प्रती करून घेणे व त्या अभ्यासातून काही निष्कर्ष काढणे व आवश्यक तर या कामासाठी इंग्लंडमध्ये जाऊन किंवा कलकत्त्याच्या व मद्रासच्या अगर बेंगलोर येथील अशा अभ्यासाला साहाय्यभूत होणाऱ्या सामुग्रीचा अभ्यास करून या 'गोखले पत्रव्यवहाराचे' समग्र स्वरूप मराठी आणि इतर भारतीय वाचकांच्यापुढे ठेवणे, हे तर कसलेही साहाय्य न लाभलेल्या माझ्यासारख्या लेखकाच्या स्वप्नातही खरे होण्यासारखे नाही. यास्तव जेवढे आपल्याला शक्य झाले व पुढे होण्यासारखे वाटते तेवढे या पुस्तकाच्या रूपाने आणि या प्रास्ताविकातील मनोगताच्या रूपाने मोठ्या प्रसन्न चित्ताने मी वाचकांच्यापुढे ठेवले आहे. त्रुटी पुष्कळ आहेत. पण काही तरी जे सांगण्यासारखे होते ते सांगितले गेले आहे असे समाधान मला हे पुस्तक हातावेगळे करताना लाभत आहे.

गोखले - नवदर्शन मालिकेतील पुढील प्रकाशनात 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी' विषयी थोडीशी नवी माहिती आता आताच मिळू लागली आहे. तिचा समावेश करून एक प्रकरण तयार करण्याच्या मी विचारात आहे. इतरही नवीन जे सांगण्यासारखे गोखल्यांच्या शिक्षणविषयक बिलासंबंधी आढळेल ते देईन. आणखीही काही. पण हे सारे पुढील प्रकाशन शक्य झाले तर !

शॉ आणि चर्चिल यांच्यातील एक प्रसिद्ध तथाकथित चुटका असा आहे.

शॉने चर्चिलला आपल्या एका नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची दोन तिकिटे पाठवली व लिहिले की एक तुमच्यासाठी व दुसरे तुमच्या मित्रासाठी. जर तुम्हाला कोणी मित्र असेल तर !

चर्चिलने आभार मानून शॉला लिहिले की, या प्रयोगाला मी हजर राहू शकत नाही. पण दुसऱ्या प्रयोगाला अवश्य येईन. जर दुसरा प्रयोग झाला तर !

नाशिक
१९ फेब्रुवारी १९८८

—मु. गो. देशपांडे

# ऋणनिर्देश

नॅशनल आर्काइव्हज् न्यू दिल्ली यांच्या सौजन्याने ' गोखले पत्रव्यवहारा'पैकी काही पत्रे झेरॉक्स प्रतींच्या रूपात अगर टंकलिखित रूपात मला उपलब्ध झाली. या पुस्तकात भाषांतरित अथवा संक्षेपरूपाने त्यातील बरीच मला उपयोगात आणता आली. उरलेली कोणती आहेत ते या पुस्तकातील प्रास्ताविकात मी नमूद केलेलेच आहे या अमोल सहकार्याबद्दल व ती वापरण्याला अनुमति दिल्याबद्दल मी नॅशनल आर्काइव्हज्चा अत्यंत ऋणी आहे. या सर्व पत्रव्यवहाराचा कॉपीराइट त्यांच्याकडे आहे.

ब्रिटिश कौन्सिलचे दिल्लीचे मुख्य कार्यालय, त्यांची मुंबई आणि मद्रास येथील कार्यालये यांच्याकडून वेळोवेळी मला मोलाची मदत झाली आहे. त्यांनी तत्परतेने या कामी मला जे साहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.

कलकत्याच्या नॅशनल लायब्ररीमधून मला जी माहिती मिळाली ती या पुस्तकाच्या पहिल्या परिशिष्टात विस्ताराने मी दिलेली आहे. त्याचप्रमाणे जाधवपूर विद्यापीठातून जे मिळू शकले तेही त्याच परिशिष्टात नमूद केले आहे. या दोन्ही संस्थांच्या सेवेचे ऋण मोठेच आहे.

मुंबई विद्यापीठाची लायब्ररी, मुंबईची एशियाटिक सोसायटीची लायब्ररी, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटची लायब्ररी, फर्गसन महाविद्यालयाची लायब्ररी, नाशिकच्या भि. य. क्ष. वाणिज्य महाविद्यालयाची लायब्ररी, नाशिकच्याच मराठा विद्याप्रसारक समाजाच्या के. टी. एच. एम. महाविद्यालयाची लायब्ररी या संस्थांचे साहाय्य वेळीवेळी मिळाल्याने बऱ्याच अडचणी दूर झाल्या. त्याचप्रमाणे नागपूरच्या गोखले मेमोरियल लायब्ररींचाही फार उपयोग झाला. या सर्व संस्थांचे ऋण मी मोकळेपणाने मान्य करतो.

निवेदिता आणि सरला रे यांच्याबद्दलची चांगली माहिती त्यांच्या त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रसिद्ध झालेल्या विशेषांकातून अगर गौरव ग्रंथातून मिळू

शकली. 'सरला रे स्मृतिग्रंथ' तर मला कलकत्त्यात तेथील गोखले स्कूल अँण्ड कॉलेजच्या त्यावेळच्या प्राचार्यांनी भेट म्हणून दिला. मी त्याबद्दल त्यांचा सदैव ऋणी राहीन.

सिडने वेब यांचा फोटो सर्व्हंटस् ऑफ इंडियाच्या पुण्याच्या मुख्य कार्यालयातील ज्येष्ठ पदाधिकारी श्री. काकडे यांच्या सौजन्याने गोखले इन्स्टिटयूटच्या लायब्ररीतून मिळाला. त्याचप्रमाणे लाला लजपतराय आणि लाला मुन्शीराम ऊर्फ स्वामी श्रद्धानंद यांचे फोटो फर्गसन महाविद्यालयातील इंग्रजीचे विभागप्रमुख डॉ. दाणी यांच्यामार्फत मला उपलब्ध झाले. हे फोटो मिळणे अतिशय आवश्यक होते. श्री. काकडे आणि डॉ. दाणी यांच्या आपुलकीबद्दल मला जरूर त्यांचे आभार मानलेच पाहिजेत. त्याचप्रमाणे नागपूरच्या सर्व्हंटस् ऑफ इंडिया केंद्राचे तरुण कार्यवाह श्री. नेवे आणि मुंबई विद्यापीठाच्या लायब्ररीचे प्रमुख श्री. अरविंद टिकेकर यांचेही व्यक्तिगत आभार मानल्यावाचून मला राहवत नाही.

गो. ए. सोसायटीचे कार्यवाह डॉ. मो. स. गोसावी यांचे जे आपुलकीचे साहाय्य मला या कामी मिळत गेले आहे. त्याचा निर्देश माझ्या पूर्वीच्या '**फ्लॉरेन्स नाइटिंगेल, वेडरबर्न आणि गोखले**' या पुस्तकाच्या छोटया प्रास्ताविकात मी केलेलाच आहे. या पुस्तकासाठी त्यांची विशेष मदत माझ्या स्वतःच्या प्रयत्नांना जोड म्हणून झाली ती इंग्लंडमधून गार्डिनरच्या '**डेली न्यूज**' या वृत्तपत्रातील १ जानेवारी १९१४ च्या अंकातील विल्यम आर्चर यांचा लेख मिळविण्याबाबत. तो लेख सारांशरूपाने या पुस्तकातील परिशिष्ट २ मध्ये दिलेला आहे. डॉ. गोसावी यांच्या या कामातील उत्साहपूर्ण सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार, मनःपूर्वक आभार, मानीत आहे.

माझा मुलगा चि. रवींद्र याने मुंबईच्या एशियाटिक सोसायटीतून मला पाहिजे असलेला बॉम्बे क्रॉनिकलच्या अंकातील गोखले स्मृतिदिनाच्या समारंभाचा अहवाल उतरून घेऊन तो मला दिला याबद्दल त्याला धन्यवाद देतो. माझे मित्र श्री. एन्. एम्. पवार, सयाजीराव गायकवाड यांचे प्रशंसनीय चरित्र लिहिणारे लेखक, यांचे बिनमोल साहाय्य मला यातील काही लेख उतरून घेण्याच्या दृष्टीने झाले आहे. सूची करीत असतानाही त्यांची थोडीफार मदत झालीच होती. त्यांनी मला जेव्हा मनाला मरगळ आल्यासारखे वाटे तेव्हा प्रोत्साहन देऊन कार्यप्रवण केले आहे. हे त्यांचे मित्रत्वाचे ऋण मी अवश्य नमूद करतो. त्यांचे आभार मानावे तितके थोडेच.

चित्रकार श्री. चारुहास पंडित यांनी मुखपृष्ठ तयार करून दिले व मुद्रक श्री. दिलीप माजगावकर यांनी या पुस्तकाची छपाई सुबकपणे करून दिली याबद्दल त्यांचेही आभार मी मानत आहे. काही मुद्रणदोष राहिले आहेत पण शुद्धिपत्र देण्याएवढे ते नाहीत.

# अनुक्रमणिका

प्रास्ताविक — सात ते अठरा
मोर्ले — १
इंडिया साप्ताहिकाची थोडीशी ओळख — ७०
सिडने वेब यांचे एक पत्र — ९३
गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास — १०७
गोखल्यांच्या भाषणांची गुणवत्ता — १३७
गोखल्यांना आलेली काही पत्रे — १६६

| | | |
|---|---|---|
| लाला लजपतराय | पान | १६७ |
| कॅनडामधील शीख नेत्यांची विनवणी | ,, | १७२ |
| लाला मुन्शीराम ऊर्फ स्वामी श्रद्धानंद | ,, | १७९ |
| रियासतकार सरदेसाई | ,, | १८२ |
| रॅटक्लिफ यांची पत्रं | ,, | १८३ |
| एफ्. जी. सेल्बी | ,, | १८४ |
| विठ्ठल रामजी शिंदे | ,, | १८६ |
| वि. का. राजवाडे | ,, | १८९ |
| बी. रामलिंग रेड्डी | ,, | १९१ |
| मृणालिनी सेन | ,, | १९२ |
| ए. के. कुमारस्वामी | ,, | १९३ |
| सी. एफ्. अॅण्ड्रयूज | ,, | १९६ |
| रवीन्द्रनाथ टागोर | ,, | २०० |
| कोल्हापुरातले ब्राह्मण | ,, | २०२ |

गोखले : निवेदिता, सरला रे आणि सरोजिनी नायडू २०६
गोखले आणि वृत्तपत्रसृष्टि २३७
सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांचे संपादक गोखले २५१

परिशिष्ट–१

बंगाल आणि गोखले २६७

परिशिष्ट–२

विल्यम आर्चर यांचा ए व्हिजन ऑफ इंडिया इन २००१ २७६
हा सारांश रूपातील लेख

परिशिष्ट–३

गोखले जीवनपट २७९
संदर्भ साहित्य २८२
सूचि २८९

# सूची

( गुहृ गोपाळ कृष्ण गोखले यांचा नामनिर्देश सूचीमध्ये करण्यात आलेला नाही. )


**अ**

अजितसिंह, ३१, ५७, ५८, ५९, ६०,
अय्यंगार, K. R. Srinivas १९२
अॅग्न्यू पॅट्रिक, ५८
अॅटी होमरुल लीग, ७४
अॅण्ड्र्यूज सी. एफ, ७, १७९, १९६, १९७, १९९ २००, २०१
अॅबट जस्टिन, २३८
अॅस्टन, २१२, २१३

**आ**

आगरकर, १८, २२, ११०, १९१, २१८, २५१, २५२
आगाखान, १५६
आगाशे भा. ब., ४०
आत्माराम पांडुरंग (डॉ.) २६६
आपटे दाजी नागेश, ४०
आपटे वा. शि. १९१
आपटे वा. गो. १२१, १२२
आपटे हरिभाऊ, १, १३०
आवा बग्गीवाला, ४३
आंबेकर द. वा. १६२, २६९
आंबेडकर (डॉ). ५६
आर्चर विल्यम, ८५, ८६, २७६–२७९
आर्यसमाज ५७, ५८, ८९
आल्कॉट कर्नल, १९
आ[illegible] १४२, १४४
ऑर्वेल जॉर्ज १५५

ऑस्ट्रियामध्ये बनविलेल्या काड्याच्या पेट्या ८०

**इ**

इबटसन, ५८, ५९
इम्मिग्रेशन अॅक्ट, १९१०– १७८
इंदूरची दिवाणगिरी, १२८

**उ**

उपनिषदे, १९

**ए**

एकनाथ, १६३
एल्जिन लॉर्ड २६५
एलीस एडमंड १३८
एव्हबरी ७७

**ओ**

ओकाकुरा ३६, २०८
ओडॉनेल सी. जे. १०, ६४
ओड्वायर १७७

**औ**

औरंगजेब १५४

**अं**

अंडरहिल मिस् एव्हलिन ८६

क

करंदीकर सदाशिवशास्त्री, ४०
कर्झन, ३, ७, ८, १४, १५, १७, २६, २९, ५४, ६२, ७०, ७७, १४०, १५४, १५८, १८३, २४३, २७४,
कलकत्ता युनिव्हर्सिटी, ७५, ७६
कर्वे डी. जी. १६२
कर्वे धोंडो केशव १८, १११, १५२
कर्वे ( क्रांतिकारक ) ३८
कॅनिंग लेडी, ११९
काथवटे प्रोफेसर, १८५
कानडे दिनकरशास्त्री, ३९, ४०
कानुनगो हेमचंद्र २०९
कामा मॅंदाम ८४, ८५
कालिदास ८८
कार्सन सर एडवर्ड ७४
काळे वा. गो. ८८
काव्हूर ६९
क्लार्क सर जॉर्ज ( सिडनहॅम ) ६०, ६१, ६२, ९८, २३१, २४६
कॉर्नवालिस २५५
क्रॉफर्ड ११०, ११२, ११३, २५१
किंग्जफर्ड ३०
किचनेर २६, ५८, ८९, १४०
किर्लोस्कर शं. वा. ४२
कुलकर्णी मास्तर २२
कुलकर्णी हणमंतराव ३८
कुमार श्रीकृष्ण प्रसन्न सेन १९, १११, १५२, २५७
कुमारस्वामी १९५, १९६
कुंझरू ५६, १०५
कूपर ७७
केतकर ज्ञानकोशकार ८८
केन १२४, १६४
केन्स लॉर्ड ८५, ९३, ९४, १०६
केंब्रिज ९३
केशवसुत ५०
केळकर १२, ३१, ५४, २६३
कोंदडराव २६७
कामा गाटामारू १७८
कोल्हटकर वामनराव ४५, १३०
क्रोमर कमिटी ६८
कॉटन हेन्री १०, १५, ६४, ९५, २७४
कौर मनमोहन ८५

ख

खरे कृष्णाजी गोपाळ ७, ४०
खरे ग. ह. ४३
खरे दाजी आबाजी २३, २५, ११७,
खाडिलकर ३८, ८३
खापर्डे १२, ५४, ७०, ११८

ग

गणपतीचे मेळे २३
गणेश उत्सव ११४, ११६
गंगा नदी १३१, १५३
गॅम्बेटा ६९
ग्लॅडस्टन २७, ११२, १५८
ग्रॅहॅम कनिंगहॅम ८६
गार्डिनर ए. जी. ७, ६६, ७५, ८४, ८५, ८६, ९८, २७८
गांधी इंदिरा १४४, २४२
गांधीजी ५०, १२०, १३४, १५३, १७२, १९६, १९९
गायकवाड–महाराणी १८३
गायकवाड–सयाजीराव १८२, १८७
गीता –(भगवद्‌गीता) १५, १९, २०
ग्रीन्स्टायडल मिस् ३६
गुप्त कृष्ण गोविंद ४, २९
गोखलियाना ९५
गोखले दा. वि. ३९
गोखले ना. वि. २३७–८
गोखले पु. पां. २, ३९, १०९
गोखले रा. य. ३५
गोखले ल. य. ३५
गोफण्या मारुती २२
गोसावी द. कृ. २१

गॅास एडमंड २२९
गांगोली दिनानाथ २५६

घ

घुगरे (सौ.) १८६
घोष अरविंद १८, २५, ३१, ४७, ४८, ७२, १३६, २३७
घोष बारिंद्र ३१, २०९
घोष मोतिलाल १८
घोष रासबिहारी ७७, १६६, १६८, १६९, २७४
घोष लालमोहन ११२
घोष हेमेंद्रप्रसाद १२९, २००

च

चक्रवर्ती ललित ८९
चर्चिल ७४
चटोपाध्याय अघोरनाथ ३७, २३६
चतर्जी बंकिमचंद्र २०, २१, २५७
चतुर्वेदी बनारसीदास १९७
चंदावरकर सर नारायण २५, ११४, १८९, १९०, १९३
चातुर्वर्ण्य १९
चाफेकर २१, ३६, ३७, ५३, ११३
चाफेकर दामोदर २२
चाफेकर बाळकृष्ण २२
चार्लू रायबहादूर आनंदा ४१
चिटणवीस गंगाधरराव १४५, १४६
चिंतामणी सी. वाय २४२
चिपळूणकर सीतारामपंत ११०, २५१
चिरोल व्हॅलेन्टाइन १७९
चुरी हवालदार ८९
चौधरी बंगाल प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष १५०
चौधुराणी सरला १८, २९

छ

छत्रे एल. एच. ११
छबिलदास रामदास २५३

ज

जमेका १४४
जयकर १०९, १३३
जयस्वाल के. पी. ७६
जंगले १००
जॅक्सन खून ३५
जाट लष्करी तुकडी ८९
जाधवपूर विद्यापीठ (कलकत्ता) २७३
जानोजी १८७
जाबडेकर ( आचार्य ) ४६, ४७, ४९, ५०, ५१, ५२, ५४, ५६
ज्वालाप्रसाद रॉय १८१
जिनसीवाले २३
जिना महमद अली १३२, १३३, २३०
जीविताचा खरा ध्रुवतारा १२७
जेन्किन्स २४५
१३ जोशी ग. व्यं. ११७, १३३, १६४ २६१

झ

झा–अमरनाथ १४, ६७

ट

टाउनशेंड मेरिडिथ ५४
टागोर रवीन्द्रनाथ १८, ८६, १३३, १६१, १९६, १९८, १९९, २००, २०२, २६८
टॉलस्टॉय ३२, २१३, २१६
टिळक २, ११, १२, १३, १६, २१, २३, २५, २८, ३०–४५, ४७, ४८, ५०, ५२, ५३, ५४, ७०, १११, ११३, ११४, ११६, १२९, १३०, १३३, १८५, १९३, २००, २०१, २६३
टेनिसन १५७

ट्रिब्यून ९६
टेलर मिसेस २७
टेंपल २९

ठ

ठाकरसी सर विठ्ठलदास १४६

ड

डफरिन २९
डार्विन २७, १४५
डिकिन्सन १५५, १६१
डिग्बी विल्यम ९६, ९७, २६१
डिप्रेस्ड क्लास मिशन १९४, २३०
डिल्क ५४
डेक्कन एज्युकेशन सोसायटी १०७, १०९, ११०, १२२, १८५
डेक्कनसभा ११७

त

तय्यबजी बद्रुद्दिन ११४, २१९
ताराचंद २१, २९
तीस लाख रुपयांचा मुकुट १८२
त्रिनिदाद १४२, १४३
तुकाराम १६३
तेजासिंग प्रोफेसर १७२
तेलंग १, १८५, १९३

थ

थोरात मास्तर २४

द

दत्त भूपेन्द्रनाथ २१०, २११
दत्त रमेशचंद्र ३, ४, ५, ९४, १६१, १६४
द्रविड नटेश आप्पाजी ३१, २३८
दयानंद १९, २५६
दादाभाई १५, ३७, ४०, ४२, २६२, २६३
दामू जोशी ३८
दास चित्तरंजन २२४
दास एम्. एन्. ३
दांडेकर नारायणभाई २५२
दुसाने दामोदर महादेव ३८
देऊसकर सखाराम गणेश ३६
देवधर १८, २३, २४, १७१
देवगिरीकर २१८
देवेंद्रनाथ १८

ध

धिंग्रा मदनलाल ६२, ६३
धिंग्रा बंधू ६२
ध्रुव २५३

न

नटराजन १०५, १९०
नलावडे गणपतराव ४३
नंदा बी. आर. ७१, २००, २२७
नाइटिंगेल फ्लॉरेन्स २८, २५९
नागपूरकर व्यं. प. ३८
नागपूरकर श्री. द. ३८
नामजोशी १११
नातू बंधू ११८
नायडू गोविंदराजुलु २३०
नायडू सरोजिनी ८६, ८७, १५२, १६१, १९४, २२६, २२९, २३०, २३१–२३६
नॉर्मन रोझामण्ड ३१, २१३
नाताळ १४२
निवेदिता १८, ३६, १३४, १६२, १९४, २२६
नेहरू ५६, १९३
नेहरू मोतीलाल १५३
नेपोलियन २१४
नोटेबलसचे राज्य ११६

प


पटवर्धन अण्णासाहेब ३६, ३८
पटवर्धन १८, २२, १११, ११३, १३०
पटवर्धन गोपाळराव ४३
पटवर्धन आर. पी. १६२
पटेल विठ्ठलभाई ५४
परांजपे रँग्लर ४०, ७५, ९७, १११, १२२, १३३, १५२, १६४, १८५, १९०, १९१
परांजपे शि. म. ३९, ४०, ४५,
पर्वते ३, ८, ३०, ३१, ३४, ५४, ९४, ११८
पंडित नलिनी ५३
पंडित शंकर पांडुरंग २५३
प्रधान आर. जी. ८१–८४
पाऊंड इझ्रा ८६
पाठक प्रोफेसर १८५
पादशाहा १९०, २३२
पार्नेल ६९
पाल १८, ५४, ७२, १२९, १३०, १९३
पिंगळे ४०
पीटरसन प्रोफेसर २५३
पुरोहित महाराज ( शंकर गजानन ) ३८
पेथिक लॉरेन्स ९४, ९५, ९७
प्रेस ॲक्ट ७७, ७८, ७९, ८१
प्रेसी कर्नल ८९, ९०
पोतदार गोविंदराव ३८
पोतदार द. वा. ३८


फ


फर्ग्युसन ११२
फर्ग्युसन कॉलेज ७५, ७६, १२२, १२३, १६३, १६४
फाटक न. र. ३, ८, ९, १०, ५३, १०७, २२८, २४९
फिजी १४४
फिशर एच. ए. एल. १३४, १३५
फिशर मिसेस १९४
फीमॅन्टलसाहेब १४५
फुलमणी २५६
फुलर ८, ९, १०
फुले १८, ३०
फेबियन सोसायटी ९६, ९७, १०६
फॉर्स्टर ई. एम्. १५५ १६१


ब


बटलर सर हार्कोर्ट ७६
बर्क ७७, १३४, १५४
बर्डवुड ११
बर्न कंपनी २१५
बर्वे स. गो. ५६, ५७
बसू भूपेन्द्रनाथ १८, ७७, ८२, १७०, १७१, २४८
बानर्जी सुरेन्द्रनाथ ९, १०, १८, ३०, ३७, ४१, १९३
बानर्जी उमेशचंद्र ७१
बानर्जी गुरुदास ७७, २७४
'बालमुत्सद्दी' ५२
ब्राइन जेम्स ११९
ब्राउनिंग १३४, १५६
ब्रॅडलॉ ९५, २५६, २५७
बिरेल ७७
बिलग्रामी सय्यद ४, २९
बुकर टी. वॉशिंग्टन ६
बुल्हर २५३
बेकर १३
बेलॉक ८४, ८५
बेव्हन ५५
बेझंट १३१, १९१
ब्रेल्सफर्ड १०६, १६१, १९५
बोअरयुद्ध २७, ६६
बोमनजी (डॉ.) १९०
बोस आनंदमोहन २२१
बोस खुदीराम ६२

बोस जगदीशचंद्र १८, १३४, २००
बोस राजनारायण २१
बंगवासी मासिक २०
बंगालची फाळणी ८, १०, १४, २६, २८, २९, ३४, १५५, १५८
बंदी घातलेल्या पुस्तकांची यादी ८१

भ

भट ४०
भागवत हरि रघुनाथ ३८
भाटे १११
भांडारकर १६, ७५, ११०, १६१, १८५, १८९, १९०, १९३, २५३
भांडारकर देवदत्त रामकृष्ण यांच्या पत्नी २७०
भानू २३
भारतीय वर्तमानपत्रांचा राष्ट्रीय आत्मजागृतीचा प्रयत्न २४१
भावनगरी १२५
भिडे व्ही. एम्. ११५
भोसेकर ४०

म

मन्रो हॅरोल्ड ८६
महाभारत १५१
मळेवाले १४२
मॅकार्नेस २४५
मॅक्लॉइड (मिस) ३६
मॅग्नाकार्टा १५७
मँचेस्टर गार्डियन ३२
मॅन (डॉ.) ३९
मॅसिंगहॅम ८४, ८५
मॅक्झिम सर हिरॅम ३६, ३७
मॅक्झिम हडसन ३७
मॅक्झिम ऑटोमेटिक गन ३७
मॅझिनी ६९, १३४, २१०
माणिकताला खटला ३१
मालवीय १७१
मॉरिस एफ. डी. यांचा मुलगा १८४
मिंटो ३, ४, ८, ९, १०, १४, २६ २८, २९, ३४, ५७, ५८, ५९ ६०, ६३, ६५
मिल १, १५, २७, १३०, १३४
मुकर्जी आशुतोष १८
मुकर्जी चारुलता २७०
मुजुमदार आर. सी. २१, ३६, ३७, ४८, १०९, २७४
मुजहिद १३३
मुंजे (डॉ.) १६९
मुंडले वा. दा. ८३
मुधोळकर १४६
मुलर मॅक्स, १९, २७६
मुल्हालची डिक्शनरी १३९
मेकॉले ७७
मेनेल एलिस ८६
मेरी इव्हान्स २७
मेस्टन १५९, १६२
मेहता फेरोजशहा १६, ४१, ४७, ११४, १२३, १२४, १२५, १५३ २६३
मोडक अ. वा. ३९
मोदी २५३
मोर्ले ३, ५, ७, ८, ९, १०, १३, १४ १५, १६, १८, २५, २६, २७, २८ २९, ३२, ३४, ४३, ५७, ५९, ६०, ६२, ६३, ६४, ६५, ६७, ७०, ७२, ७३, १०६, ११३, १२४, १३०, १६८, २१३

य

यूल १५५
येटस् डब्ल्यू. बी. ८६, ८७, ८८
येरवडेकर १०७, १११
यंग शार्लट ७७

र

रणजी ७
रमाबाई पंडिता ११८, २५३

रसूल अब्दुल ७६, ७७
रॅटक्लिफ एस. के. ८७, ९६, १०६, १६३, १८३
रॅण्डचा खून २४, ३३, ३५, ३६, ११३
राजकारणात लहान पोर ३४
राजद्रोह म्हणजे काय? ६३
राजवाडे इतिहासाचार्य ४३, ५६, १८६
राजवाडे प्रोफेसर १११, १८९
राजासिंग १७२
राजेंद्रप्रसाद १०९, २६७
राजोपाध्ये १८५
राणा ७०
राणीचा जाहीरनामा ५१, ५२
राजेंद्रलाल २०१
राधाकृष्णन् ५६
रानडे ५, ११, ५१, ५२, ५६, ११०, ११४, ११७, ११८, १२३, १३३, १५६, १५७, १६२, १६३, १८५, १९३, २६१, २६३, २६४, २६५,
रानडे रा. द. १९९
रामकृष्ण परमहंस २१, १९९, २०६
रामदास १६३
रामनाथन पी. १५१
रामायण १५१
राष्ट्रीय ग्रंथालय १८२
रॉलिन्सन ८८
राशिंगकर २०४, २०५
रॉस रॉबर्ट ८७
रिप व्हॅन विंकल १४६
रिस्ले ६४, ६५
रुद्र १९७
रे. पी. सी. १८
रे लॉर्ड ११२, ११३, १५४, २५१, २५३
रे सरला १८, १३३, १९४, २२५, २२६, २२९, २३७, २६९–२७२
रेड्डी सी रामलिंग ५५, ६५, ८४, १९१, १९६, २२९
रोजर्स प्रो. थोरल्ड १५५
रोदरमंड इंदिरा ५५
रोदरमंड डिटमार ५५, ६४
रोदन्स्टीन १९५

**ल**

लजपतराय लाला १६, ३१, ४९, ५७ ५८, ५९, ६०, १०५, १२५, १३०, १३५, १३६, १६६–१७०, १७२, १७९, १८३, १९६, १९९
लवाटे ४०
लॅन्सडाउन ११३
लॅमिंग्टन ६०
लालकाका ६२
लालचंद १७१
लाला हरदयाळ ७, १३६, १९७, १९८, १९९
लिटन २९
लिबरल क्लब ९३
लिव्हर चार्लस ७६
लीवॉर्नर ५
लेकी ७७
लेविस जॉर्ज हेन्री २७
लंडन काऊंटी कौन्सिल ९९
लंडन टाइम्स ११९
लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ९७
लंडन स्कूल ऑफ ओरिएंटल अँण्ड आफ्रिकन स्टडीज ६८

**व**

वर्मा श्यामजी कृष्ण ४४, ७०, ८४, १९३, २५३
वाच्छा ११४, २२९
वाजपेयी अंबिकाप्रसाद २०, २१
वाडिया प्रोफेसर १३३
वायली कर्झन ६२, ६३
वालिजर साहेब ३९
वास्वानी टी. एल्. २२१, २२२

वासुदेव बळवंत ३९
विजापूरकर १६, १७, २८, ३९, ४५, १११, २०३
विद्यासागर पंडित ईश्वरचंद्र २६० २६१
विल्क्स १५७
विल्बरफोर्स बिशप १४५, १९८
विल्सन खबायतचे अधिकारी २५४
विवेकानंद १८, २६, १५१, १९९
विवेकानंद मेमोरियल फंड २१९
विश्वश्वरा १६१
विश्वेश्वरय्या १३४, १९४
व्हिटवर्थ ६४
व्हिक्टोरिया महाराणी १७३
व्हीलर ५१
वेअरिंग मेजर स्कॉट १९८
वेडरबर्न १५, २५, २७, ३४, ४१, ४२, ४४, ४७, ७१, ७२, ८४, ८९, ११०, ११४, १३३, २२४, २२९
वेडरबर्न लेडी १३३, १९४
वेब ७७, ८१, ८२, ८५, ९७, ९८, १०४, १०५, १३३, १७९, १९४,
वेल्बी कमिशन ११७, १३३
वेल्स एच. जी. ६७, ८०, ८५, ८६, ९८
वेस्ट रेमंड २५३
वेस्टलॅण्ड २६८
व्हॅटले बिशप ७६,
वैद्य लक्ष्मण जगन्नाथ ११५
वॉल्पर्ट स्टॅन्ले ५, ६, ८, ९, १०, २१, २७, ३६, ५७, ५९, ६०, ६२, ६५, ६७, ६८, २६५

## श

शशधर पंडित १९, २०, २१, २००
शहाउद्दीन १७१
शॅफ्टस्बरी लॉर्ड ११९
श्रद्धानंद स्वामी (लाला मुन्शीराम) १७९, १८०, १८१
शाकुंतल ८७
शारदादेवी माताजी २१७
शार्प ७६
श्वाइट्झर १९७
शास्त्री (नामदार) ९५, १३७
शास्त्री शिवनाथ २२१
शाहू महाराज २०५
शॉ बर्नार्ड ८५, ८६, ९८
शिखरे दा. न. २२
शिवजयंती उत्सव ११, १२, २३, २५, ८३, ११४, ११६
शिवाजी क्लब ३८
शिंदे वि. रा. १८, १३१, १३३, १८६, १८९, २३०
शेक्सपिअर १५३

## स

सच्चिदानंदसिंह २४२
समर्थ अनिल ८३
सरकार यदुनाथ ८५
सरदेसाई १८२
सॅन्डहर्स्ट २६५
सरदार गं. बा. ५४
सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ३१, ४६ ५०, ९७, १०५, १२०, १२१–१२३, १२५, १२७, १२८, १३०, १६५
सयानी २६५
सहानी टी. के. १०७, १०८
स्ट्रॅची १५४, १५८
साइक्स मार्जरी १९७
साठे शिवराम हरी २६१
सातवळेकर पंडित ३७
साने गुरुजी ९२, १०७
सामळदास लल्लुभाई १०५, १२३, १६४, २३७

सायमन्स आर्थर २२९
सावरकर ३९, ४०, १३६
स्वामी विद्यानंद भारती ३५
सिहेरा नंदसिंग १७६, १७७
सिंह नामदार ७९, ८२, २४६
स्टिफन कॉलेज ६, ७,
स्विनि ४६
स्मिथ डनलॉप ५९, ६२, १७१, २००
सीताबाई श्रीमंत इंदूर महाराजांच्या कन्या १८७,
सुखठणकर १८८
सुजन शिपाई ८९
सुधारक पत्र २२, २४
सुधीरचंद्र १३१, १३३
सुरतेचा बखेडा ११६
सुरावर्दी ७६, ७७, ८७
सुंदरसिंग १७२, १७३
सेटल्ड फॅक्ट ९, १०
सेन केशवचंद्र १८
सेन नरेंद्रनाथ रायबहादुर २४९
सेन मृणालिनी १९२, १९३
सेल्बी ११०, १८४–१८६, २०३
स्टेड विल्यम ३२, ९४, ९६, ९७
स्पेन्सर १५, २७, १३०, २३९–४२

ह

हक्स्ले टॉमस हेन्री १४५
हॅम्पडेन १५७
हॅम्लेट १२६
हॅमिल्टन २५, १४०
हॅरिस १७, ११२
हॅरिसन फ्रेडरिक २७, १३०, २१६
हार्डिंग ६३, ७३
हारकोर्ट १७३
हॉबहाऊस ५४
हॉबहाऊस कमिशन ६८
हॉल डब्ल्यू. डी. १७३
हॉल फील्डिंग ५४
हॉल रेव्हरंड १७२
हॉयलंड ३३
हितवाद १३७
हिंदू पुनरुज्जीवनवादी १८
हिंदुस्थान सरकारचे दारिद्य ९९
हेअर ९, १०
हेमिंग्वे १२७
हेस्टिंग्ज वॉरन ६
ह्याम्स एडवर्ड १०६
ह्यूम ए. ओ. ४१, ४२, ७१, ११४, ११५, ११६, १३३, २६२
ह्यूलेट सर जॉन १०२

ज्ञ

ज्ञानचक्षू पत्र २४

'तुमच्यासारख्यांनी केवळ अस्तित्वात असणे हीच राष्ट्राची सेवा होईल हे कृपा करून आपण ध्यानी घ्यावे, कारण तुमचे जीवन केवळ उपयुक्त आहे एवढेच नव्हे तर इतरांना तो दीप आहे, आम्ही तुम्हाला गमावू शकत नाही' असे रवीन्द्रनाथ टागोरांनी ना. गोखल्यांना पाऊणशे वर्षांपूर्वी (१९१३ साली) लिहिले होते. जे टागोरांनी तेव्हा म्हटले ते आजच्या भारताच्या दृष्टीनेही तितकेच सत्य आहे. गोखल्यांना आपण गमावू शकत नाही. त्यांच्या दृष्टीसमोरील भविष्यकालचा भारत हा धर्मनिरपेक्ष, लोकशाहीप्रधान आणि विधायक दृष्टिकोनाचा होता. त्यांचे जे राजकीय कार्य झाले व सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीमार्फत जे सामाजिक जागृतीचे आणि आर्थिक उत्थापनाचे, जनसेवेचे कार्य झाले त्या कार्यांचे महत्त्व नव्या भारताच्या पायाभरणीच्या दृष्टीने असामान्य होते. आज बऱ्याच प्रमाणात गोखल्यांच्या ध्येयदृष्टीनेच भारताची जडणघडण होत असलेली आपण पाहात आहोत.

म्हणून गोखले यांच्या कार्यासंबंधी जेवढी अधिक व नवनवीन माहिती हाती येईल तेवढी अतिशय मोलाची ठरेल. या पुस्तकात गोखल्यांना आलेली अशी किती तरी आजवर अज्ञातच राहिलेली पत्रे दिली असून गोखले चरित्राच्या साधनामध्ये या पुस्तकाने अतिशय महत्त्वाची भर घातली आहे. विठ्ठल रामजी शिंदे, स्वामी श्रद्धानंद किंवा सिडने वेब यांचा आजपर्यंतच्या 'गोखले' विषयक साहित्यात कधी कोणी उल्लेख केला होता ? पण गोखल्यांना आलेली त्यांची पत्रेच आता वाचकांना हे पुस्तक किती नवीन माहितीने भरलेले आहे त्याची ग्वाही देतील.